जगात दोन वृत्तिच्या व्यक्ति असतात – आस्तिक आणि नास्तिक ! दोन भिन्न प्रवृत्तिंच्या व्यक्ति असतात – प्रथा, परंपरा रीति न जुमानणार्या किंवा त्यांच्या अति आहारी जाणार्या , तसेच दोन भिन्न स्वभावाच्या व्यक्ति असतात – बेडर,निडर किंवा डरपोक. मात्र कसाही उलट-सुलट विचार केला तरी त्या वृत्ति-प्रवृत्ति , स्वभावाच्या व्यक्तींना त्याचे बरे-वाईट परीणाम भोगावेच लागतात . माणसाच्या हातून चूक होते – ती उघड झाली तर तर स्वीकारण्याचे धैर्य दाखवणारा , परीणामांना सामोरे जाणारा एक वर्ग असतो आणि ती चूक झाकून नेण्याची 'कातडी बचाव' वृत्ति असणारा दूसरा वर्ग ! या अशा मनोवृत्तींचा, प्रथा परंपरांचा एकंदर ऊहापोह आपल्या वाचनात येतो तो डॉ. छाया महाजन यांच्या नव्या कादंबरीत – ' डोईचा पदर आला खांद्यावरी '. आधी हे शीर्षकच आपल्याला विचारा करायला लावते – एक तर स्त्री-केन्द्रित कथा असणार हे तर लक्षात येते. मग केंद्रस्थानी स्त्री आहे म्हटल्यावर तिच्या मनाचे सर्व कंगोरे ही कथा शोधते, स्पर्श करते आणि सादर होते ही कादंबरी .

शीर्षकात वापरलेला संत जनाबाईचा अभंग पूर्ण वाचला तर लक्षात येते की पिढ्यां-न- पिढ्या , वर्षानुवर्षे स्त्रीला पुरुषापेक्षा जास्त भोग भोगावे लागलेत , लागतात – तिची चूक असो वा नसो . या अभंगात जनीदेखील कबूली देते की ती आता स्वनिर्णयाप्रत आली आहे , ती म्हणते – 'भरल्या बाजारी जाईन आणि केशवा तुझाकडे येईन' , मग लोक भले 'मला वेसवा का म्हणेनात' मी माझ्या निर्णयाशी ठाम राहीन. ' या कादंबरीतील नायिका कोमल हिला हेच नेमके उमगते , पण ते आयुष्याच्या उतारावर , पुलाखालून बरेच पाणी वाहून गेल्यावर . मात्र तेंव्हा तिची मानसिक अवस्था जनीसारखीच आहे – डोईचा पदर घेतला खांद्यावरी , आता कोण मज मना करी '. आता तिला कोणाच्या काहीही सांगण्याची , कोणाचे काही ऐकण्याची , मानण्याची गरज उरलेली नाही .

लेखिकेने कादंबरी प्रथम पुरुषी एक वचनी स्वरूपात मांडली आहे .नायिकेच्या मनातील आंदोलने 'मी' च्या भाषेत जास्त सहज व प्रभावी वाटतात , मनाला भिडतात. ही या कादंबरीची जमेची बाजू .

स्त्रीच्या अवहेलनेला जशी बहुतांशी पुरुषप्रधान संस्कृती जबाबदार ठरते तशीच बाई स्वत:सुद्धा अनेकदा कारणीभूत ठरते – कारण बाईचा स्वभाव! बाईलाच बाईचे सुख पहावत नाही , बाईच बाईला पाण्यात पहाते आणि बाईच बाईला संकटात टाकते. तरीही हे ही सत्य आहे की बाईच बाईला समजून घेऊ शकते , मदतीचा हात देऊन संकटातून बाहेर काढू शकते आणि प्रसंगी तिचा उद्धारही करु शकते . डॉ. छाया महाजन यांनी समाजातील या स्थित्यंतराकडे नेमकेपणाने पाहिले आहे.

चूक कधी मुद्दाम घडत नाही – अजाणतेपणे, अज्ञानाने , मोहाने ,आकर्षणाच्या आहारी जाऊन , विपरीत परिणामांना विचारात न घेता घडलेली , केलेली कृति म्हणजे चूक. त्या चुकीचे वाईट- अनपेक्षित –सर्वनाशी परिणाम झाले की भोग संपता संपत नाहीत . हीच अवस्था आहे या कादंबरीच्या नायिकेची .

या कथानकाच्या मांडणीतून लेखिकेने तरुण पिढीच्या, खरे तर स्त्रीच्या वर्तणुकीचे विश्लेषण केले आहे . खरे प्रेम आणि भिन्न लिंगाकर्षण याची चर्चा केली आहे , जी तरुण पिढीला मार्गदर्शक ठरेल . चूक घडून गेल्यानंतर नायिकेच्या मानसिक विश्वात उल्थापालथ होते . जे घडले ते ते खर्या प्रेमापोटी कि ते दैहिक आकर्षण म्हणावे ? आपल्याला खरेच हा जन्माचा जोड़ीदार हवा आहे का ? या प्रश्नाची उकल होता होत नाही हे या कादंबरीचे कथानक आहे. मनोमिलन , मानसिक शांति , प्रेमाचे विश्वासात रूपांतर या भावनांना नायकाच्या चारित्र्यात स्थानच नाही . स्त्री म्हणजे उपभोग्य वस्तु , तिच्या मानहानिशी त्याचा काडीमात्र संबंध नाही . हे सर्व नायिका अनुभवते मन मारून केलेल्या लग्नानंतर . या सर्व गोष्टिंचा कडेलोट होतो तोपर्यंत पदरी एक मुलगी येते. .... आणि नायिका घरदार सोडून स्वतंत्र जगण्याचा निर्णय घेते . अनेक अडचणी पार करत सुख-शांति शोधत रहाते . वय वाढत जाते आणि स्वतंत्र झालेली ,स्वबलावर उभी ठाकलेली नायिका 'सत्य' काय आहे याचा शोध घेता-घेता अध्यात्म व तत्वज्ञानाच्या मार्गावर जाते . ती कबूल करते कि 'तत्वज्ञानानं ,अध्यात्मानं मला चालत ठेवलं होतं . संत तुकाराम म्हणतात तशी प्रार्थना मी रोज करत होते ...

' एकांताचे सुख मज देई देवा

आघात या जीवा चुकवूनि '

लेखिकेचे अत्यंत आभार मानावेत की जनाबाईच्या अभंगातील स्त्री-शक्तिची जाणीव त्यांनी एका भिन्न विचाराने पाहिली , वर्तमान सामाजिक स्थितीच्या दृष्टीने जोखली आणि त्याला कथानकाची चौकट दिली . आपल्या संत साहित्याची ऊंची मान मोडेल इतकी उंच आहे हे निश्चित.

पुस्तकाच्या मलपृष्ठावार एक वाक्य आहे – ' स्त्रीला वेढणार्या कौटुंबिक, सामाजिक , मानसिक कुंपणाचा वेध घेणारी ही कादंबरी ...'--- हेच वाक्य थोड़े पुढे न्यावे असे वाटते --- एका स्त्रीनेच एका स्त्रीच्या निमित्ते सर्व स्त्रीयांच्या कुंपणाचा वेध सर्वांसमोर मांडला आहे आणि त्यातून आत्मविश्वाचा मार्ग दाखवला आहे.

लेखिकेने इतक्या ओघवत्या भाषेत ही कथा मंडली आहे वाचक सलग वाचत रहातो , त्यात इतका मग्न होतो की काही ठिकाणी नेत्र ओलावतात . कुठल्याही प्रकारचे योगायोग यात नाहीत. घडते ते आणि तसे समाजात अनेक ठिकाणी आपल्याला दिसते . मनोविश्लेषणात्मक अंगाने जाता-जाता 'परिस्थितीनुसार व्यक्तिचे मन कसे दोलायमान होते' हयाचे विश्लेषण खूपच भावते . 'भवताल आपल्यावर परिणाम करत असतो . त्या भवतालात जात , धर्म , लिंग हे घटक आपल्याला सामाजिक नियम व नैतिकतेच्या चौकटीत बांधतात ' असे सांगत लेखिकेने व्यक्ति स्वातंत्र्याचा पुरस्कार करत आशादायी दिशा दाखवली आहे की या सर्वातून बाहेर पडता येते , आत्मशक्तिच्या जोरावर जगता येते . 'डोईचा पदर' खोचून ती खंबीरपणे आयुष्य जगू शकते – हा निर्णय वाचकाला पटतोच पटतो – हेच लेखिकेचे यश आहे .

------------------------------------------------------------------------ माया महाजन . --------------------------